Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प - पशुधन आधार सेवा (MACP)

पशुआधार सेवेची उद्दीष्टे;-

- या प्रकल्पांतर्गत मोठ्या जनावरांचे २० बाजार व लहान जानावरांच्या (शेळ्या / मेंढीचे बाजार) ४ बाजाराचे बळकटीकरण प्रकल्प कालावधीत करण्यात येणार आहे. बाजारात विक्री योग्य व पुरेशा प्रमाणात पशुधन उपलब्ध होण्यासाठी पशुधन घटकांची शाश्वत व गतीमान वाढ साध्य करण्यांत येणार आहे. सध्या पशुसंवर्धन खात्यामध्ये विस्तार सेवा देण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे पशुधन विस्तार सेवा कक्षेचा विस्तार करण्यांसाठी पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती नेमुन साध्य करण्यांत येणार आहे.
- शेळी व मेंढी पालन करणारे शेतकरी असंघटीत असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत नाही. अशा असंघटीत शेळी मेंढीपालन करणारे शेतक-यांचे संघटन करून व त्यांचे उत्पादन गट स्थापन क रून त्याना प्रशिक्षण दिल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार आहे. पुणे शहरात आधुनिक कत्तलखाना स्थापन करणे व मटन व पशुजन्य मूल्यवर्धीत उत्पादनाची विक्री व व्यापार वाढविणे यासाठी अभ्यास करण्यांत येणार आहे.
- पशुसंवर्धन विभागात संगणकीय माहीती उपलब्ध होण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे जरी पशुजन्य उत्पादनात लक्षणीय वाढ होत असली तरी संगणकीय माहीती उपलब्ध नसल्यामुळे माहीतीची देवाण घेवाण करता येत नाही. हे करण्यासाठी पशुसंवर्धन विपणन व माहिती कक्षाची स्थापाना करण्यांत येणारआहे .

पशुआधार सेवेचे अंमलबजावणी कार्यक्षेत्र या प्रकल्पांतर्गत मोठ्या जनावरांचे २० बाजार व लहान जनावरांच्या (शेळ्या / मेंढीचे बाजार) ४ बाजाराचे बळकटीकरण प्रकल्प कालावधीत करण्यात येणार आहे. या बाजारांच्या लाभक्षेत्रातून तुन पशुआधार सेवेची टप्पानिहाय अंमलबजावणी करण्यांत येणार आहे.

| टप्पा - १ जिल्हे (मोठ्या जनावरांचे बाजार, शेळ्या मेंढ्यांचे बाजार) | | टप्पा - २ जिल्हे (मोठ्या जनावरांचे बाजार, शेळ्या मेंढ्यांचे बाजार) | | टप्पा -३ जिल्हे (मोठ्या जनावरांचे बाजार, शेळ्या मेंढ्यांचे बाजार) | |
|---|---|---|---|---|---|
| १ | चांदुर बाजार-जि. अमरावती | १ | सावनेर - जि. नागपूर | १ | वसई - जि. ठाणे |
| २ | करंजा - जि. वाशिम | २ | लाखानी - जि. भंडारा | २ | पिंपळगाव बसवंत - जि. नाशिक |
| ३ | पुसद- जि. यवतमाळ | ३ | आमगाव - जि. गोंदीया | ३ | शिरपुर- जि. धुळे |
| ४ | मेहकर - जि. बुलढाणा | ४ | कडा- जि. बीड | ४ | अंमळनेर- जि. जळगाव |
| ५ | नेवासा - जि. अहमदनगर | ५ | सांगोला- जि. सोलापूर | ५ | पाचोरा- जि. जळगाव |
| ६ | कर्जत - जि. अहमदनगर (शेळी मेंढी बाजार) | ६ | अकलुज- जि. सोलापूर | ६ | दौंड- जि. पुणे (शेळी मेंढी बाजार) |
| | | | | ७ | खेड- जि. पुणे |
| | | | | ८ | दहीवडी- जि. सातारा (शेळी मेंढी बाजार) |
| | | | | ९ | लोणंद- जि. सातारा |
| | | | | १० | सांगली- जि. सांगली |
| | | | | ११ | आटपाडी- जि. सांगली (शेळी मेंढी बाजार) |
| | | | | १२ | वडगाव पेठ- जि. कोल्हापुर |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्पातंर्गत पशुधन आधार सेवा या पशुसंवर्धन विभागाचे मंजूर घटक/घटकांसाठीचा उपलब्ध निधी.

(रु. लाखात)

| | | | |
|---|---|---|---|
| – | ग्राम पशुसंवर्धन विस्तार संघ पशुसंवर्धन विस्तार महिला ग्राम संपर्क कार्यकर्ती | - | १००.०० |
| – | जनावरांची आरोग्य तपासणी शिबीरे | - | ४४६.४० |
| – | पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर जिल्ह्यात शेळी/मेंढी पालकांना शेतकऱ्यांना आधार देणे व शेळ्या/मेंढ्यांची संघटीत बाजार व्यवस्था निर्माण करणे. | - | ७२.०० |
| – | बीड व यवतमाळ जिल्ह्यातून शेळी पालन एक उच्चमुल्यवर्धीत व्यवसाय यांची प्रात्यक्षिके राबविणे | - | ११५.०० |
| – | पुणे येथील राज्यस्तरीय पशुसंवर्धन प्रशिक्षण संस्थेचे बळकटीकरण करणे | - | ०२७.०० |
| – | पशुसंवर्धन विपणन व माहिती कक्षाची स्थापना करणे (आयुक्तालय स्तर) | - | ५२०.०० |
| | एकुण | - | १२८०.४० |

जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्पातंर्गत आत्मामार्फत पशुधन आधार सेवा या पशुसंवर्धन विभागाचे मंजूर प्रशिक्षण/अभ्यास दौरे/प्रात्यक्षिके साठीचा उपलब्ध निधी

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रशिक्षण | | (रुपये लाखात) |
| – | पुरवणी बाजार धोरणाची तयारी, धोरणात्मक संशोधन व विस्तार आराखडा अंतर्गत पशुसंवर्धन अधिकाऱ्याचे प्रशिक्षण | - | ५१.०० |
| – | पशुसंवर्धन खात्यातील क्षेत्रीय विस्तार अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण | - | ३२.४० |
| – | बीड व यवतमाळ येथील प्रात्यक्षिक शेळी पालक लाभार्थ्यांना प्रशिक्षण | - | ०६.५० |
| – | पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर जिल्ह्यात शेळी/मेंढी पालकांना प्रशिक्षण | - | ५८.५० |
| | अभ्यास दौरे | | |
| – | राज्याअंतर्गत शेतकरी अभ्यास दौरे | - | ०९.०० |
| – | राज्याबाहेर शेतकरी अभ्यास दौरे | - | १८.०० |
| – | बीड व यवतमाळ येथील प्रात्यक्षिक धारकांच्या क्षेत्राचे दौरे | - | ११.२५ |
| | प्रात्यक्षिके | | |
| – | प्राणी कल्याण शिबीरे/पशुधन व्यवस्थापन प्रात्यक्षिके | - | ५२.५० |
| – | चारा उत्पादन प्रात्यक्षिके | - | १७५.०० |
| | एकुण | - | ४१४.१५ |